**दिवाणी चौकशी अर्ज क्र.०१/२०१८**
नागिनी आश्रू वगैरे वि. कोणी नाही

**आदेश निशाणी ०१ खालील**
{पारीत दिनांक २३/०४/२०१८}

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी केला आहे.

२) अर्जदारांची अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :-

अर्जदार ही मौजे स्वामी समर्थनगर, कर्जत. ता. कर्जत, जि. अहमदनगर येथील रहिवासी असून अर्जदार हिचे पती आश्रू उर्फ आश्रूकांत कोंडीबा ससाणे यांचे बरोबर हिंदू धर्मशास्त्र पध्दतीप्रमाणे विवाह झालेला आहे. अर्जदार हिचे पती आश्रू उर्फ आश्रूकांत यांचे हयातीमध्ये अर्जदार हिची सख्खी बहिण आशा हिचे बरोबर विवाह झालेला होता. सदर आशा हिस रेखा नावाची मुलगी व कुलदिप नावाचा मुलगा अशी अपत्ये झालेली आहेत. आशा ही सतत आजारी असल्यामुळे आणि मुलांची देखभाल होत नसल्यामुळे आश्रू उर्फ आश्रूकांत यांनी आशा हिची सख्खी बहिण अर्जदार हिचे बरोबर कायदेशीर विवाह केलेला आहे. अर्जदार हिस पती आश्रू उर्फ आश्रूकांत यांचेपासून शाम, नितीन, कुलभुषण, गणेश, दिनेश अशी पाच मुले व हेमा नावाची मुलगी अशी अपत्ये झालेली आहेत. सर्व मुलांची व मुलींचे विवाह झालेले आहेत.

३) अर्जदार हिचे पती आश्रू उर्फ आश्रूकांत हे उपजिल्हाधिकारी म्हणून विशेष भुसंपादन अधिकारी क्रं. २ अप्पर तापी प्रकल्प हातनुर जळगांव येथे शासकिय नोकरीत होते. ते दिनांक ३१/०३/१९९८ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवानिवृत्तीनंतर त्यांना नियमीतपणे निवृत्ती वेतन मिळत होते. अर्जदार यांचे पतीने मुळ सेवापुस्तकात व निवृत्ती प्रदान

आदेशात आशा आश्रू ससाणे यांची नोंद केलेली होती. आश्रू उर्फ आश्रूकांत यांची पहिली पत्नी ही दिनांक १५/०५/२०१५ रोजी मयत झाली. त्यानंतर अर्जदार हिचे पती हे किडणी व शुगरच्या आजारामुळे त्यांना नियमित डायलेसीस करोव लागत होते. त्यामुळे आजारपणात त्यांनी मयत आशा आश्रू ससाणे यांचे ऐवजी अर्जदार हिचे सेवा पुस्तकात व निवृत्ती वेतन पुस्तकात नोंद करावयाचे राहिले आणि त्यानंतर अर्जदार हिचे पती आश्रू उर्फ आश्रूकांत कोंडीबा ससाणे हे दिनांक १८/०५/२०१७ रोजी मयत झालेले आहेत. त्यांच्या पश्च्यात अर्जदार हिस निवृत्ती वेतन मिळण्याचा अर्जदारास कायदेशीर अधिकार आहे. त्यामुळे अर्जदार हिने निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडे निवृत्तीवेतन मिळणेकामी अर्ज केला असता त्यांनी दुस–या पत्नी या नात्याने निवृत्ती वेतन मिळत नाही तसेच मे. कोर्टाचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र आणावे असे लेखी दिनांक १५/१२/२०१७ रोजी कळविले. अर्जदार हि पती आश्रू उर्फ आश्रूकांत यांचे मृत्युनंतर निवृत्ती वेतन मिळण्याचा अर्जदार हिस पत्नी या नात्याने कायदेशीर अधिकार आहे. अर्जदार ही मयत आश्रू उर्फ आश्रूकांत कोंडीबा ससाणे यांचे कायदेशीर वारस आहे. तसेच मयत आश्रू उर्फ कोंडीबा ससाणे याचे मुलांना व मुलींना नियमानुसार निवृत्ती वेतन मिळण्याचा अधिकार नाही. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज अर्जदार ही मयत आश्रू उर्फ आश्रूकांत कोंडीबा ससाणे यांची पत्नी या नात्याने निवृत्ती वेतन मिळणेकामी कायदेशीर वारस आहे असे प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

३) अर्ज दाखल असतांना मयत अश्रुकांत यास अर्जदार क्रं. २ ते ८ हे ही कायदेशीर वारस आहेत हि बाब पटलावर आली. त्याप्रमाणे अर्जदाराने निशाणी १३ वर अर्ज देवून अर्जदार क्रं. २ ते ८ यांना समाविष्ट केले.

४) प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यावर त्यावर जाहीरनामा काढण्याचा आदेश करण्यात आला.

५) अर्जदारांनी आपल्या अर्जाच्या समर्थनार्थ (नि.०३) सोबत जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांचे पत्राची झेरॉक्स प्रत, मा.निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्याकडे दिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत, पेन्शन पेमेंट आदेशाची प्रत, मृत्युप्रमाणपत्र (आशा आश्रूकांत ससाणे), नागिनी आश्रू ससाणे यांचे मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड, आधारकार्ड झेरॉक्स प्रत, मयत आश्रूकांत कोंडीबा ससाणे यांचे मृत्यूचे दाखल्याची झेरॉक्स प्रत, दाखल केलेली आहे. तसेच (नि.०९) सोबत जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचा दैनिक प्रभात दिनांक १७/०१/२०१८ रोजीचा अंक सादर केला. त्यानंतर (नि.१०) कडे अर्जदार क्र.१० नागिनी आश्रू ससाणे याचे व साक्षीदार शामकांत आश्रू ससाणे याचे पुराव्याचे शपथपत्र (नि.११) सादर केले.

६) अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारांनी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जातील सर्व कथनांचा पुनरुच्चार केल्याचे दिसून येते. तर (नि.०३) लगतच्या मृत्यू दाखल्यावरून आश्रू उर्फ आश्रूकांत कोंडीबा ससाणे हे दिनांक १८/०५/२०१७ रोजी कर्जत, ता.कर्जत येथे मयत झाल्याचे दिसून येते. तसेच दाखल केलेल्या वर्तमानपत्रावरून जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिसते. परंतू सदर जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत प्रकरणात कोणी हजर झाले नाही. अर्जदारचा शपथेवरील पुरावा पाहता ती मयत आश्रुकांत यांची कायदेशीर विवाहाची पत्नी आहे. आश्रूकांत याने प्रथम पत्नी आशा हि नेहमी आजारी असल्याने व मुलांची देखभाल होत नसल्याने अर्जदारशी विवाह केला आहे. तिला आश्रूकांत पासून सहा अपत्ये झाली आहेत. आश्रूकांत यास आशाबाई पासून

अर्जदार क्रं. ७ व ८ हि अपत्ये झाली आहेत. या कारणांचा विचार करता अर्जदार हे मयत आश्रूकांतचे कायदेशीर वारस आहेत या कथनात तथ्य वाटते. यांच्या शिवाय अन्य कोणी वारस आहेत असा पुरावा पटलावर नाही अगर तसा कोणीही आक्षेप घेतला नाही. अशा परिस्थितीत अर्ज मंजूर करण्यास कोणतीही बाधा वाटत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**: आदेश :**

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) अर्जदार क्र.१ ते ८ हे मयत आश्रू उर्फ आश्रूकांत कोंडीबा ससाणे याचे वारस आहेत असा वारस दाखला देण्यात येत आहे.

(सदरचा वारस दाखला फक्त मयताचे वारस अर्जदार आहेत यासाठी दिलेला असून कोणताही आर्थिक लाभ मिळवण्यासाठी त्याचा उपयोग करता येणार नाही.)

सही/-

दिनांक :२३/०४/२०१८. ( ध.ज. पाटील )

कर्जत. सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कर्जत.